दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकांनी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 17 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 261 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# मुंबई मनपा लुटणाऱ्यांची हंडी फोडणार

# देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना इशारा

## निवडणुकीनंतर विजयाच्या हंडी फोडण्याचा विश्वास



**मुंबई (वृत्तसंस्था)**–आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महापालिकेला लुटणाऱ्यांची हंडी फोडणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना इशारा दिला आहे. निवडणुकीनंतर विजयाची हंडी फोडणार असल्याचा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.भाजप आमदार राम कदम यांच्या वतीने घाटकोपरमध्ये आयोजित दहीहंडी महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दहीहंडी महोत्सवाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर विजयाची हंडी तर आम्ही फोडणारच आहोत. मात्र ज्यांनी महानगरपालिका लुटली, त्यांच्या पापाची हंडी देखील आम्ही फोडणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही जी हंडी लावू त्यातले लोणी हे सर्व सामान्यांना मिळेल, ते कोणाच्या घरात जाणार नाही, हा प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडली होती. आता मुंबईमध्ये राम कदम यांच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूरची आठवण म्हणून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयी फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पाकिस्तानच्या पापाच्या हंडी भारतीय सैनिकांनी फोडली होती. त्या सैनिकांना या ठिकाणी सलाम केला जात आहे. याबद्दल राम कदम यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या सैनिकांना समर्पित दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूरमध्ये आपल्या सैनिकांनी पाकिस्तानची पापांची हंडी फोडली आणि आता येथे, त्याच सैनिकांचा सन्मान केला जात आहे. कृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीनिमित्त मी सर्वांना शुभेच्छा देतो. हा सण महाराष्ट्रातील मुंबईत मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. कितीही पाऊस पडला तरी येथील आपल्या गोविंदांचा उत्साह कमी होऊ शकत नाही. मुंबई महानगरपालिका निवडणुकीबद्दल पुढे ते म्हणाले की, पापांची हंडी आधीच फुटली असल्याने बदल घडणारच आहे. आता एक नवीन हंडी रचली जाणार आहे आणि आम्ही समाजातील सर्व घटकांना त्याचे लोणी वाटण्यासाठी काम करू.

### सुरज भैयांच्या संकल्पनेतून साकारले पंकजाताईंचे तैलचित्र!

# महाकुंभ मधील अवस्मरणीय क्षणातील तैलचित्र पाहुन ताईसाहेब भरवल्या

## सुरज घुलेंनी दिलेल्या अनमोल भेटीचे पंकजाताईंनी केले कौतुक

**केज । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यातील सहभाचा अवस्मरणीय तेजस्वी क्षणा ला मुर्तस्वरूप देण्याची संकल्पना ताईंचे खंदे समर्थक सुरज भैय्या घुले यांनी मांडल्या नंतर सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी प्रत्यक्षात पंकजाताई यांचे तैलचित्र हुबेहूब साकारले.हे तैलचित्र सुरज भैय्यानी पंकजाताई यांना मुंबई येथील त्यांच्या सरकारी बंगला रामटेक येथे भेट दिल्यानंतर अक्षरशः ताईसाहेब भारावून गेल्या.तसेच सुरज घुलेंनी दिलेल्या या अनमोल भेटीचे पंकजाताई मुंडे यांनी कौतुक केले.दिल्लीतील सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांच्याद्वारे ही पेंटिंग बनवण्यात आलेली आहे. महेश पंडित यांनी मा.राष्ट्रपती रामनाथ कोविंदजी,पंतप्रधान नरेंद्र मोदीजी,गृहमंत्री अमित भाई शहा,अरुण जेटली अशा अनेक नेत्यांच्या पेंटिंग्स बनवलेल्या आहेत.पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा प्रयागराज येथील महाकुंभ



दरम्यानचा फोटो या पेंटिंगसाठी निवडण्यात आला होता.ही पेंटिंग ६ फुट उंच व ४ फुट रुंद आहे.पेंटिंग तयार करण्यासाठी कलाकारांना तब्बल दोन महिन्यांचा कालावधी लागला.या पेंटिंगची संपूर्ण संकल्पना केज येथिल भाजपचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांची होती.त्यांनी १३ ऑगस्ट २०२५ रोजी रामटेक,मुंबई येथे मंत्री ना. पंकजाताई मुंडेना ही पेंटिंग भेट म्हणून दिली. भेटी दरम्यान महत्त्वाच्या विषयांवर मंत्री ना.पंकजाताई मुंडेशी सुरज भैय्या घुले यांची चर्चा झाली.

### सुरज भैय्या घुले यांची संकल्पना ;पंकजाताई मुंडेनां झाला आनंद

**तैलचित्र फ्रेम तयार करून सुरज भैय्या घुले यांनी ना.पंकजाताई मुंडे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट दिला.प्रयागराज' येथील महाकुंभ दरम्यान फोटोचे तैलचित्र सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी हुबेहुब साकारल्याबद्दल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चित्रकार महेश पंडित यांचे फोनवर बोलून कौतुक केले.इतकंच नाही तर हे तैलचित्र त्यांनी तातडीने त्यांच्या बंगल्यात लावलंही.तसेच ना.पंकजाताई मुंडेनी महत्वाच्या विषयावर बोलण्यासाठी खास राखून वेळ दिल्याबद्दल त्यांचे आभार सुरज भैय्या घुले यांनी व्यक्त केले.**

# मांजरा धरणाचे चार दरवाजे उघडले

## नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा ईशारा

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील धनेगाव ता केज येथील मांजरा प्रकल्प ९०% च्या जवळपास भरला असल्याने पाण्याचा येवा पाहता काल दि १६ ( शनिवार ) रोजी मांजरा धरणाचे चार दरवाजे उघडण्यात आल्याची माहिती अभियंता सुरज निकम यांनी दिली

मागील दोन ते तीन दिवसांपासून मांजरा प्रकल्प क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला परिणामी मांजरा नदीच्या सहायक नद्याही तुडुंब भरून वाहू लागल्या व तीन जिल्ह्याची लाईफलाईन ठरणाऱ्या मांजरा धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याचा येवा सुरु झाला परिणामी दोनच दिवसात धरणाची पाणीपातळी ३५ टक्यावरून ९० टक्यांवर पोहोचली धरणात येणाऱ्या पाण्याचा येवा लक्षात घेत धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार प्रकल्पाचे क्र १, ६, ३ व ४ हे चार दरवाजे ०.२५ मीटरने उघडण्यात आले . या चार दरवाज्यातून मांजरा नदीपात्रात ९८.९६ घन मीटर प्रति सेकंद म्हणजेच ३४९४.२८ क्युसेक्स (९८.९६ क्युमेक्स) एवढा पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. दरम्यान हि परिस्थिती पाहत प्रशासन अलर्ट मोडवर असुन नदीकाठच्या गावांना



पूर्वीच सतर्कतेचा ईशारा देण्यात आला होता .मागील वर्षी ऑक्टोबर मध्ये भरले होते धरण :- मागील वर्षी १६ ऑक्टोबर रोजी धरण भल्याने १६ ऑक्टोबर रोजी चार दरवाजे उघडले होते. तसेच एकूण दहा दिवस धरणाचे दरवाजे उघडण्यात आले होते हे विशेष दरम्यान धरण पुर्ण क्षमतेने अनेक वेळेस भरले असले तरी मांजरा धरणाच्या इतिहासात यापूर्वी दोन वेळेसच ऑगस्ट महिन्यात धरण भरून दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याची नोंद असून आज तिसऱ्यांदा ऑगस्ट महिन्यात धरण भरून पाण्याचा विसर्ग करावा लागत आहे.

# गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या एस.पीं.च्या निषेधात माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचे आंदोलन



**बीड । प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या विशेष प्रसंगी, माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक अनोखा निषेध नोंदवला. त्यांनी गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधीक्षकाचा फोटो गळ्यात अडकवून निषेध केला. यावेळी त्यांची पत्नीही उपोषणात सहभागी झाल्या. गेल्या अनेक दिवसांपासून विविध पद्धतींनी आंदोलन करण्यात येत असूनही न्याय न मिळाल्यामुळे वाघमारे यांनी हे पाऊल उचलले आहे. बीड तालुक्यातील शिवनी येथील गट नंबर ६६२ या ठिकाणी ते गायरान शेती करत आहेत आणि त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अन्नधान्य पिकवून होतो.

अलीकडे त्यांच्या घरातील शेड पाडून त्यांच्यावर अन्याय झाल्याची घटना घडली आणि याबाबत संबंधित आरोपींवर कारवाई नाही झाल्याने त्यांचा निषेध करण्यासाठी वाघमारे यांनी हा उपाय केला. मारहाणीचे व्हिडिओ उपलब्ध असूनही कारवाई न झाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षकांचा फोटो गळ्यात घालून न्यायाची मागणी केली.

या घटनेद्वारे त्यांनी गुन्हेगारांवर कारवाई करण्याची आणि गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

# दिव्यात स्वातंत्र्यदिनी मोफत आरोग्यशिबीर व वह्या वाटप

## भाजप युवा मोर्चाचे डॉ.सतीश केळशीकर यांचे आयोजन

**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा शहरातील भाजप युवा मोर्चाचे ठाणे जिल्हा सरचिटणीस डॉ. सतीश केळशीकर यांच्या आयोजनाने स्वातंत्र्यदिनी मोफत आरोग्यशिबीर व शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. देवांशी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल (दिवा) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसंगी मोफत मेडीकल आणि हेल्थ चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. प्रसंगी हृदयरोग सल्ला व तपासणी (एउत्र), आस्थिरोग सल्ला व तपासणी, मधुमेह सल्ला व तपासणी, पोटाचे विकार सल्ला व तपासणी, स्त्रीरोगतज्ञ विषयक सल्ला व तपासणी करण्यात आले. मधुमेहचे औषधे मोफत दिली गेली. प्रसंगी असंख्य लोकांनी आपला सहभाग नोंदवला असून संपूर्ण शारीरिक तपासणी आरोग्य शिबीरात मोफत करण्यात आली. सदर आरोग्य शिबिराचे आयोजन केळशीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते. प्रसंगी दिवा शहरातील अनेक गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप देखील करण्यात आले.

प्रसंगी सदर शिबीरास भारतीय जनता पार्टीचे सचिन



भोईर (दिवा शीळ मंडळ अध्यक्ष) विजय भोईर, सपना भगत (दिवा शीळ महिला मोर्चा अध्यक्षा ), रोशन भगत, अशोक पाटील, रामराज मिश्रा, नितीन कोरगावकर, रवी मामुणकर, विठ्ठल गुरव, गणेश भगत, विनोद भगात, संजय सिंग, कमलाकर पाटील, तेजस पास्टे, दत्तात्रय कोलते, रिया मोरे, साधना सिंग तसेच डॉ. पल्लवी जाधव ( देवांशी मल्टीस्पेसियालिटी हॉस्पिटल दातीवली ) आदी मान्यवर उपस्थित होते.

# शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून विकास साधणार पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर (वृत्तसंस्था)**–लातूर जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. यामाध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधून नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री भोसले बोलते होते. प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव, विद्यार्थी, पालक व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात आली आहे. लातूर शहराच्या २९० कोटींच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि शेती क्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजना, जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यासारख्या योजनांमुळे शेतीला बळ मिळत असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. जिल्ह्यातील शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत आतापर्यंत ८८२ किलोमीटर लांबीचे ६७८ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. लवकरच या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

संपादकीय

# श्वानदंश



रात्री-अपरात्री घरी परतणे आता दिवसेंदिवस धोक्याचे बनत चालले आहे. ही भीती चोरट्यांची, लुटमार करणाऱ्यांची अथवा नशाबाज करणाऱ्यांची नसून भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाची आहे. भटक्या कुत्र्यांकडून एकवेळ भुंकणे समजू शकते; परंतु अलीकडे या कुत्र्यांच्या झुंडीमुळे अनेकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. ही समस्या कोणा भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. यामुळे स्वत: सर्वोच्च न्यायालयाला भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर स्वत:हून याचिका दाखल करून घ्यावी लागली. समस्येचे गांभीर्य त्यातूनच दिसून येते. आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्या लक्षणीय आहे. या श्वानप्रेमींना ही कुत्री स्वत:च्या घरात सांभाळायची नाहीत, तर रस्त्यावर, चौकाचौकांत असणाऱ्या भटक्या कुत्र्यांना खाद्य घालायचे आहे. एकीकडे श्वानांकडून होत असलेल्या उपद्रवाची जबाबदारी स्वीकारायची नाही आणि दुसरीकडे श्वानांविरोधात कारवाई केल्यास त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलने करायची, न्यायालयाचे दरवाजे ठोठावयाचे अशा घटना श्वानप्रेमींकडून वाढू लागल्यात. रात्रीच्या वेळी उच्चभ्रू मंडळी आपल्या वाहनातून खाद्य घेऊन रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा शोध घेतात. राजधानी दिल्लीमध्ये सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल २६ हजारांहून अधिक जणांना मोकाट कुत्र्यांनी चावे घेतल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला या समस्येची दखल घ्यावी लागली. दिल्लीमध्ये चावा घेण्याच्या संख्येत वाढ होत असली तरी यावर्षी जानेवारी ते जून दरम्यान ६५ हजारांपेक्षा अधिक कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण झाले आहे. महापालिका कार्यक्षेत्रामध्ये रात्रीच्या वेळी कचरा संकलन करणाऱ्या, कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांना, धुरीकरण करणाऱ्यांना, मूषक नियंत्रण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व रात्रीच्या वेळी जे नागरी समस्या निवारणाचे व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करतात, त्यांना महिन्यातून अनेकदा कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी कुत्रा चावण्याच्या ३७ लाखांहून अधिक घटना घडत; ३०५ लोक रेबीजमुळे मरण पावतात. केवळ निर्बीजीकरण पुरेसे नाही, मानवी जीवितांचे संरक्षण करणे आता आवश्यक झाले आहे. ३७ लाख हा आकडा कागदोपत्री असला, तरी प्रत्यक्षात हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत असणाऱ्या कचराकुंड्या भटक्या कुत्र्यांचे माहेरघर बनले आहे. कचराकुंड्यांमध्ये सहजासहजी खाद्य उपलब्ध होत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी कचराकुंड्याभोवती दिसून येतात. घरात पाळल्या जाणाऱ्या कुत्र्यांची प्रशासन दरबारी नोंद करण्यास तसेच प्रशासनाकडे शुल्क भरणा करण्यास संबंधितांकडून टाळाटाळ केली जात असते. अनेकदा काही घटकांकडून लहानपणापासून घरामध्ये कुत्री पाळायची, पुढे तीच कुत्री रस्त्यावर सोडून दिली जातात.दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर मुंबईतील भटक्या श्वानांच्या बंदोबस्ताची मागणी आता मुंबईकर नागरिकांकडून सुरू झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उरण, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ, वसई-विरार भागातही मोकाट कुत्र्यांकडून चावे घेण्याचे, हल्ले करण्याची समस्या गंभीर झाली आहे. स्थानिक प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी श्वानाची धरपकड करण्याची मोहीम गल्लोगल्ली राबविली जात असते, त्यावेळी हे श्वानप्रेमी मोकाट कुत्र्यांना गच्चीवर तसेच सोसायटींच्या आवारात लपवून ठेवत असतात. गेल्या पंधरा वर्षांत १२ लाख ७३ हजार तर २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार २५३ मुंबईकरांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. त्यामुळे, भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करून त्यांनाही आश्रयस्थानात हलवण्याची मागणी होत आहे. २०१४ च्या गणनेनुसार मुंबईत ९५ हजार १७४ भटके श्वान होते. गेल्या अकरा वर्षांत मुंबईतील भटक्या श्वानांची संख्या काही लाखांत गेली आहे. मुंबईत गेल्या २२ वर्षांत १६ लाख ६० हजार भटक्या श्वानांचा प्रश्न कायम आहे. दरवर्षी मुंबई महापालिका या भटक्या श्वानांची निर्बीजीकरण करत असते. मात्र, दर पावसाळ्यात हा प्रश्न ऐरणीवर येतो. भटक्या कुत्र्यांची समस्या नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच पालिकेने उपाय करण्याची मागणी होत आहे. मुंबईतील अनेक आमदारांनीही मतदारसंघातीलच नाही तर शहर व उपनगरातील भटक्या कुत्र्यांना आळा घालण्यासाठी महापालिकेकडे टाहो फोडला आहे. मुंबई पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे काही आमदारांनी मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी करून, त्यांच्यासाठी आश्रयस्थाने तयार करून तेथे स्थलांतरीत करावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे, कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना कमी होतील आणि सार्वजनिक सुरक्षेची वाढती चिंता कमी होण्यास मदत होईल, असा दावाही केला आहे. २००९ ते २०२४ या कालावधीत भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी २४ कोटी ३ लाख २७ हजार रुपये खर्च करण्यात आले. भटक्या कुत्र्यांची समस्या मुंबईलगतच्या नवी मुंबई शहरातही आहे. तिथेही दिघा ते बेलापूरदरम्यान भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. यावर्षी जानेवारीपासून जुलै अखेरपर्यंत शहरात सात महिन्यांत ६ हजार ९३९ जणांना त्यांनी चावा घेतला. दिघा, ऐरोली व घणसोली तसेच एमआयडीसी परिसरात व गावठाण विभागात दहशत अधिक आहे. रात्रीच्या वेळी भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या फिरताना नवी मुंबईमध्ये ठिकठिकाणी दिसतात. रात्री उशिरा घरी येणाऱ्यांच्या मनात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. महापालिकेकडून श्वानांच्या निर्बीजीकरणाकडे दुर्लक्ष झाल्याने ही समस्या गंभीर झाल्याचा आरोपही होत आहे. भटक्या कुत्र्यांच्या समस्येची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली असली, तरी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रशासनाला नागरिकांकडून सहकार्य मिळणेही तितकेच गरजेचे आहे.

# संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे पत्रकार चंद्रकांत पाटील व गौतम बचुटे यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील पंचायत समितीच्या कर्मचारी निवासस्थानी संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन पत्रकार चंद्रकांत पाटील व गौतम बचुटे यांच्या शुभहस्ते दि.१५ ऑगष्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघर्ष माजी सैनिक सेवा संघाचे केज तालुकाध्यक्ष मेजर अजिमोद्दीन इनामदार शेख हे होते.सर्वप्रथम फलकाचे फित कापुन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष तथा दैनिक समर्थ राजयोग चे तालुका प्रतिनिधी तथा स्वाभिमानी न्युज चे संपादक चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.तसेच कार्यालयाचे उद्घाटन आदर्श पत्रकार संघाचे पदाधिकारी तथा दैनिक पुढारी चे प्रतिनिधी गौतमजी बचुटे यांच्या शुभहस्ते फित कापुन करण्यात आले.यावेळी माजी सैनिक बांधवांनी श्रीफळ वाढवून कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी प्रास्ताविक करताना माजी सैनिक मेजर रामप्रभु राऊत यांनी सांगितले की,पत्रकार



आणि सैनिक यांच्या मुळे देशात सौहार्दाचे वातावरण कायम राहिलेले आहे. सैनिकाचा धर्म व जात माणुसकी आहे त्यामुळे भारत देशात शांतता नांदत आहे.सिमेवर डोळ्यात तेल घालून सैनिक सेवा बजावत असतात त्यामुळे सैनिकांप्रती आदरभाव असावा तसेच माजी सैनिकांच्या अडी अडचणी सोडविण्या साठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पत्रकार गौतम बचुटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत माझ्या परिवारामध्ये सैनिक आहेत याचाआपल्याला अभिमान आहे. सैनीकांच्या पाठीशी सदैव आपण राहु अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.पत्रकार चंद्रकांत पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की, संघर्ष माजी सैनिक सेवा संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन आपल्या हस्ते संपन्न झाले हा आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा दिवस असुन स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आमचा सन्मान माजी सैनिकांच्या हस्ते झाला हे आमचे भाग्य आहे तसेच माजी सैनिकांच्या सुखदुःखात आम्ही कायम सोबत आहोत असे त्यांनी सांगितले. पत्रकार नंदुलाल मिसाळ यांनी बोलताना सांगितले की,माझे बंधू सैन्य दलात सेवा बजावत असताना शहीद झाले आहेत. कोल्हेवाडी येथे त्यांचे स्मारक असुन सर्व शासकीय कार्यक्रमाच्या वेळी तेथे सन्मान केला जातो.अध्यक्षीय समारोप करताना मेजर अजिमोद्दीन इनामदार शेख यांनी सांगितले की, माजी सैनिकांच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली याबद्दल प्रशासनाला धन्यवाद दिले तसेच माजी सैनिकांच्या कामासाठी आपण सदैव कार्यरत आहोत हे सर्व माजी सैनिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे.या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिल्या बद्दल सर्वांचे आभार मानले. यावेळी देशमुख यांच्या भाषणाने वातावरण भावनीक झाले होते. शेवटी राष्ट्रगीताने हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी माजी सैनिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदामराव पंडितांचा बंगला कार्यकर्त्यांनी फुलला यशराज पंडित यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## सहारा अनाथालयात विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

स्पष्टवक्तेपणा आणि मनमिळाऊ स्वभाव आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे प्रत्येक युवकांना आपला मित्र वाटणारे युवा नेते यशराज पंडित यांचा दिनांक १६ ऑगस्ट रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा बंगला युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे चिरंजीव युवा नेते यशराज पंडित यांचा १६ ऑगस्ट रोजी वाढदिवस गेवराई तालुक्यात विविध उपक्रमांनी युवकांनी उत्साहात साजरा केला. कमी वयात तरुण मित्रांची मोठी फळी आणि तीही जीवाला जीव देणारी निर्माण करण्याचे काम यशराज पंडित यांनी तालुकाभरात केले आहे. प्रत्येकाच्या अडीअडचणीला धावून जाणारा आणि वेळप्रसंगी स्वतःचाही जीव धोक्यात घालणारा जीवाभावाचा मित्र म्हणून यशराज पंडित यांच्याकडे गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावचा युवक पाहतो. वडील



बदामराव पंडित यांच्याप्रमाणेच स्वभावगुण असलेले यशराज पंडित हे गेवराई तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबाच्या सुखदुःखाच्या प्रसंगी आवर्जून उपस्थित राहून आपलेपणाने राहतात. त्यामुळे त्यांच्याविषयी गाव, वाडी, वस्ती, तांड्यावरील लोकांमध्ये मोठा विश्वास निर्माण झालेला आहे. १६ ऑगस्ट रोजी यशराज पंडित यांचा वाढदिवस असल्याने दिवसभर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी ग्रामीण भागातून आपापल्या गाड्यांमधून येत तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित झाला होता. प्रत्येकानेच आपल्या लाडक्या युवा नेत्याचे शाल, श्रीफळ व फेटे बांधून सत्कार करत केक व पेढा भरून त्यांचे तोंड गोड केले. यावेळी बोलताना यशराज पंडित म्हणाले की, सर्व मित्र परिवाराला एकत्र आणण्यासाठी माझा वाढदिवस हे एक कारण आहे. परंतु माझ्या सर्व मित्रांना एकत्रित पाहण्याचा योग आणि बोलण्याची संधी मला या वाढदिवसानिमित्त मिळाली यात मी माझे समाधान मानतो. बदामराव आबांनी ज्याप्रमाणे सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन प्रत्येकाच्या अडीअडचणी समजून घेतल्या आणि कुटुंबाप्रमाणे त्यांना साथ दिली. अगदी त्याचप्रमाणे मीही या पुढील काळात प्रत्येक कुटुंबासोबत त्यांच्या घरातला मुलगा म्हणून राहण्याचे भाग्य मिळवणार आहे आणि तो अधिकार गेवराई कर मला देतील असा मला विश्वास असल्याचे ते म्हणाले.

यावेळी दिवसभरात गेवराई विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, चेअरमन, पत्रकार, विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विशेषतः वडीलधारी मंडळी व तरुण मित्रांनी बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी तोबा गर्दी केली होती.

# महाराणी ताराबाई विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन पावसात मोठ्या उत्साहात साजरा

## एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र झाल्याबद्दल सुमित थोरात व अनिकेत शिंदे यांचा स्वातंत्र्यदिनी मा.आ.केशवराव आंधळे यांच्या हस्ते सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रारंगणामध्ये ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

आरएसपी व स्काऊट गाईडच्या पथकाने मान्यवरांना मानवंदना दिल्यानंतर ध्वजारोहण सोहळ्याच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

राष्ट्रगीत व राज्य गीताचे गायन झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार



शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.अनिलदादा चोले,आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मधुकररावजी धस,वडवणी कृ.उ.बा.स.संचालक पांडुरंग बापू अंडील,वडवणी कृ.उ.बा.स.संचालक रणजीत भैय्या धस,पशुवैद्यकीय डॉ.नेहरकर तसेच विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

स्वागत गीत गाऊन विद्यार्थिनीने मान्यवरांचे व उपस्थितीतांचे स्वागत केले. महाराणी ताराबाई विद्यालयाचे माजी विद्यार्थी चि.सुमित थोरात यांचा एम्स मेडिकल कॉलेज रायपूर तर चि.अनिकेत शिंदे यांचा बीजे मेडिकल कॉलेज पुणे या ठिकाणी एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र झाल्याबद्दल माजी आमदार केशवराव आंधळे व विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे- डोईफोडे मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन पालकासह सत्कार करण्यात आला तसेच महाराणी ताराबाई विद्यालयाचे व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या सुसज्ज डिजिटल कार्यालयाचे फीत कट करून माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले देशभक्ती गीत गायन,देशभक्ती गीतावर नृत्य,महापुरुषांच्या वेशभूषा,देशभक्ती गीतावर कवायती विद्यार्थ्यांनी सादर करून १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन भरपावसात मोठ्या उत्साहात साजरा केला. सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अंडील जी.पी.व सौ.प्रियांका कुरकुटे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील व इंग्लिश स्कूल मधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुप्पा येथे ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन पावसात मोठ्या उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

कुप्पा येथील, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे भारतीय ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी शाळेच्या प्रारंगणामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला ,नामदेव सावंत यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व राज्य गीताचे गायन झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला



या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. स्वागत गीत गाऊन विद्यार्थिने मान्यवरांचे व उपस्थितीतांचे स्वागत केले देशभक्ती गीत गायन,देशभक्ती गीतावर नृत्य,महापुरुषांच्या वेशभूषा,देशभक्ती गीतावर कवायती विद्यार्थ्यांनी सादर करून १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन भरपावसात मोठ्या उत्साहात साजरा केला. सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख राठोड सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक कापले सर, शेकडे सर काळे सर शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे (आखाडे) यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षात जाहीर प्रवेश

**केज । प्रतिनिधी**

दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या ऐतिहासिक दिवशी केज तालुक्यातील धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे (आखाडे) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटामध्ये जाहीर प्रवेश केला. बीड येथे पार पडलेल्या या भव्य कार्यक्रमात तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते, महिला व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या प्रसंगी मा. रमेशराव आडसकर साहेब, जिल्हा अध्यक्ष राजेश आबा चव्हाण, आमदार विजयसिंह पंडीत, युवा नेते योगेशभैया क्षीरसागर, जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहून अंजलीताईंचे पक्षप्रवेशाचे स्वागत केले. मंचावर मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

डॉ. अंजलीताई घाडगे या गेल्या अनेक वर्षांपासून केज तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक व महिला सक्षमीकरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. महिला बचतगट चळवळ, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, तसेच दुर्बल घटकांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या समाजाभिमुख कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये स्थान दिले.या वेळी बोलताना जिल्हा अध्यक्ष राजेश आबा चव्हाण म्हणाले की, डॉ. अंजलीताईंच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तालुक्यात सह जिल्ह्यातील महिला व सामाजिक चळवळीला नवी ऊर्जा मिळणार आहे.

रमेशराव आडसकर यांनीही अंजलीताईंच्या कार्याचे कौतुक करत म्हणाले की, त्यांच्या समाजकारणामुळे पक्षाची पकड ग्रामीण व शहरी भागात अधिक मजबूत होईल.

डॉ. अंजलीताई घाडगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मी समाजातील वंचित घटक, महिला व शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आतापर्यंत लढा दिला आहे. आता अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली हा लढा अधिक प्रभावीपणे लढविणार आहे. सामान्यांच्या हक्कासाठी झटणे हेच माझे ध्येय आहे.या प्रवेशामुळे बीड जिल्हातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवी उभारी मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.



# केज पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा

## बाल विवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेऊन सर्वांनी घेतली शपथ

**केज । प्रतिनिधी**



केज पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून गुलाल,धूप लावून विनम्र अभिवादन करण्यात आले.श्री.अजयजी ढोकर कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पंचायत समिती केज यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. आणि महाराष्ट्र माझा हे गीत गायन झाले आणि सर्वांनी बालविवाह प्रतिबंधक सामूहिक प्रतिज्ञा गावुन शपथ घेतली की,आपण कोणीही बालविवाह करणार नाही याची शपथ घेतली व समाजात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेणार यावेळी मोठ्या प्रमाणात माजी सैनिक नागरिक सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री.अजयजी ढोकर, विस्तारअधिकारी चौरे,रोडेवार,मुळे, मासूमदार,शेख,रासवे,येनकुळे,सरवदे,पटेल, राऊत,चव्हाण,बनकर मॅडम,केदार मॅडम, पवार मॅडम,कांबळे मॅडम,राऊत मॅडम, शेरेकर,पत्रकार विश्वास राऊत,घुले गुरुजी, किसन कदम सर्व कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्हीएमडी नर्सिंग महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

**परळी । प्रतिनिधी**



व्हीएमडी म्हणजेच वैजनाथराव मुकुंदराव देशमुख नर्सिंग महाविद्यालय, परळी प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन व अभिवादनाने झाली. त्यानंतर संस्थेचे संचालक प्रकाश देशमुख यांनी तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण केले. कार्यक्रमानंतर सामूहिक राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेण्यात आले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालक आणि संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते,ज्यामध्ये सौ. संध्या दीपकराव देशमुख, कोषाध्यक्ष गणेश देशमुख, अनंतराव देशमुख, बालाजी जगतकर, सतीश सानप, प्रदीप देशमुख, दिनेश देशमुख, संदीप देशमुख यांचा समावेश होता. महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रमोद पतकी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्साहवर्धक वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अचिव्हर्स अकॅडमी बीडचे संचालक प्रा.अर्जुन राठोड होते. त्यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी प्रा.अर्जुन राठोड यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षमय वाटचालीची आठवण करून देत, देशप्रेमाची प्रेरणा घेऊन शिक्षणात प्रामाणिकपणे प्रगती करण्याचे आवाहन केले. प्राचार्या सौ. उमा जगतकर यांनी विद्यार्थ्यांना देशभक्ती व कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले. यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका मनीषा पैठणकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन सहाय्यक शिक्षिका शेख फातिमा यांनी मानले.यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळा ही संस्कारांची खरी गुरुकिल्ली असून तिथे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडतात–सौ.काशीद

**पनवेल । प्रतिनिधी**

आपल्या मुलाने विद्यालयांमध्ये गुणवत्तापूर्वक कामगिरी केल्यानंतर प्रत्येक आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावते .समाजात त्यांना मानाचे स्थान मिळते .अशीच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होऊन त्यांच्यात अभ्यासाची जिद्द त्यांनी उराशी बाळगावी याकरता कळंबोलीतील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या ज्ञानमंदिर विद्यालयात ज्या विद्यार्थ्याने दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला आहे त्याच्या आई-वडिलांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाचे ध्वजवंदन करण्यात येऊन त्यांना गौरविण्यात आले. यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची ओढ आणि स्पर्धा निर्माण होऊन विद्यार्थी मोठ्या यशाने पास होतील असे मत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संजना बाईत व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक चंदू गवळे यांनी व्यक्त केले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या म.ए.सो ज्ञानमंदिर व पब्लिक स्कूल कळंबोली विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात वातावरणात आणि एक अभिनव उपक्रमाने सामाजिक बांधिलकी जोपासून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राजाराम फडतरे (माजी सैनिक) लाभले. तसेच ध्वजारोहण करण्याचा मान एस.एस.सी. परीक्षेमध्ये प्रथम आलेली विद्यार्थिनी कु.स्नेहल सतीश काशीद हिचे पालक सतीश वसंत काशीद व ज्योती सतीश काशीद यांना मिळाला. तसेच पब्लिक स्कूल मधून प्रथम आलेली विद्यार्थिनी कु.आयुषी पात्रा हिचे पालक सुदेशना पात्रा यांना ध्वजारोहणाचा मान मिळाला. विद्यालयाने प्रथमच विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची जिद्द स्पर्धा निर्माण व्हावी याकरता जे दहावीच्या परीक्षेत विद्यार्थी प्रथम क्रमांक पटकावतील त्यांच्या आई-वडिलांकडून या पुढील ध्वजारोहण करण्यात येईल असे विद्यालयाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. यामुळे निश्चितच विद्यार्थी हा प्रत्येक जण विद्यालयात प्रथम येण्यासाठी अभ्यासाची पराकाष्टा करेल आणि त्यामुळे विद्यार्थी चांगले घडतील अशी अपेक्षा विद्यालयाने व्यक्त केली आहे.



७९ वा स्वतंत्राच्या शुभ दिनी वाढदिवस असलेल्या विद्यार्थ्यांना पुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर माननीय प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दोन्ही शाळांच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले.तसेच प्रमुख पाहुण्या सौ काशीद यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.त्यात शाळा ही संस्कारांची खरी गुरुकिल्ली असून तिथे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडतात व ते भविष्यातील चांगले नागरिक बनतात , त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थी त्यांच्या स्वप्नांपर्यंत सहज पोहचू शकतात तसेच आजचा हा दिवस सर्व विद्यार्थी ,शिक्षक व पालकांना प्रेरणा देणारा आहे असं त्या आपल्या मनोगतातून म्हणाल्या.स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली काढण्यात आली. अशाप्रकारे देशाचा स्वातंत्र्य दिन विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.

# पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद उमेश चौरे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामविकास अधिकारी एस. डी. बचुटे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रध्वज फडकावून त्याला सलामी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीने ओतप्रोत परेड सादर करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रिन्सिपल अशोक मस्के यांनी केले. ज्युनियर केजी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर मनोगते मांडली. शेवटी अध्यक्षीय समारोप उमेश चौरे यांनी करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख अजय भांगे यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन पठाण सर यांनी केले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापक रामेश्वर घुले सर ,चौरे मॅडम,मुळे मॅडम,पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम,दळवे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम, अक्षता मॅडम, प्रगती मॅडम, अमृता मॅडम, लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, युवराज मगर, सिद्धार्थ शिनगारे सर, विशाल सिरसट सर, राऊत सर, काळे सर, निखिल भांगे सर यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात जादुटोणा विरोधी कायद्याची जागृती सर्वदूर करा–जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



जादुटोणा, अंधश्रद्धा व अघोरी प्रथा या समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरतात. त्यांचे उच्चाटन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यासाठी जिल्ह्यात सर्वदूर जनजागृती करा, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केल्या.

जिल्हास्तरीय जादुटोणा विरोधी जनजागृती, प्रचार व प्रसार समितीची बैठक आज जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण प्रविण कोरगंटीवार, उपविभागीय पोलीस अधिकारी वैभव कलबुर्गे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.डॉ. आशिया म्हणाले, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन होण्यासाठी अधिनियम २०१३ जारी करण्यात आला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांत व्याख्याने व कार्यक्रमांचे आयोजन करावे. तसेच ग्रामीण भागातही या कायद्याबाबत प्रभावीपणे जागृती व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

# श्री अंबिका प्राथमिक विद्यालयात गोकुळाष्टमीचा जल्लोष

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक विद्यालयात गोकुळाष्टमी निमित्त जल्लोषमय वातावरणात गोपाळकाला व दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. राधा व श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या लहानग्यांनी उपस्थितांचे मन मोहून टाकले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी व कृष्णजन्माच्या गीतांनी कार्यक्रमाला भक्तिमय रंगत आणली. दहीहंडी फुटताच हाथी घोडा पालकी, जय कन्हैया लाल की या जयघोषाने शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात विद्यार्थीवर्ग सामील झाला. शाळेच्या अंगणात सुंदर रांगोळ्या काढून, फुलं व फुग्यांनी सजावट करण्यात आली होती. रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव शिवाजीराव भोर व उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी तसेच विद्यालयाचे प्राचार्य नवनाथ बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी शाळा समिती सदस्य रावसाहेब सातपुते, अंबादास गारुडकर, प्रशांत कोतकर, थोरात सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पूजा गोरे, सुधीर आघाव, ऋषिकेश दळवी, कांचन ससे, शितल गायकवाड, प्रियंका सातपुते, अश्विनी कल्हापूरे, वर्षा चौरे, कविता शेळके, स्वाती जाधव, जयश्री जपकर, रेखा रासकर, शुभांगी बनकर, गायत्री गुंजाळ, अश्विनी कांबळे, मिनाज पठाण, प्रतिभा साबळे, अवंती कुलकर्णी, सुजाता येवले, सविता औटी, सुवर्णा शिंदे, ठोंबरेतसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हिंदी-मराठी गाण्यांवरील नृत्य व नाट्यरूप सादरीकरणांनी रंगत वाढवली. टाळ्यांच्या कडकडाटात लहानग्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. शिवाजीराव भोर यांनी दहीहंडी हे एकतेचे प्रतीक असल्याचे सांगत, अशा सण-उत्सवातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणले जाते, तसेच विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांना वाव मिळतो असे नमूद केले. प्राचार्य नवनाथ बोडखे म्हणाले, गेल्या दोन दिवसांपासून विद्यालयाच्या माध्यमातून 'हर घर तिरंगा' मोहीम राबवून हा गोपाळकाला साजरा करण्यात आला. लहानग्यांनी आपल्या विविध कलागुणांनी सर्वांची मने जिंकली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# शेतकरीपुत्र खा.सोनवणे भरपावसात शेतकऱ्यांच्या बांधावर ; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिला धीर

## केज तालुक्यात मांजरा नदीच्या पाण्याने ओलांडले पात्र, शेती, पिकांसह घरांचेही अतोनात नुकसान

**बीड । प्रतिनिधी**

सलग दोन दिवस धो-धो पाऊस...केज तालुक्यात मांजरा नदीतील पाण्याने पात्र सोडले. संपूर्ण मांजराकाठ आणि जवळपास सात गावातील नदीपात्रा शेजारील शेतात पाणी शिरले... उभे पिक वाहून गेलेच पण शेतीही खरडून गेली... डोळ्यादेखत होत्याचे नव्हते झाले. अनेकांच्या राहत्या घराचीही पडझड झाली. यावेळी ज्यांच्या त्यांच्या डोळ्यात पाणी उतरले. दुपारी १२ वाजता खा.सोनवणे यांना यानगावांमधून फोन आले. यानंतर सोनवणे यांनी नियोजीत दौरा रद्द करून तातडीने क्षतीग्रस्त गावे गाठली. यावेळी पाऊस सुरूच होता. पडत्या पावसात खा.सोनवणे शेतात पोहचले. नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, असा शब्दही शेतकऱ्यांना दिला.

बीड जिल्ह्यात काही दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे बीड तालुक्यातील पाली, नाळवंडी, चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश, पाटोदा तालुक्यात पाटोदा, थेरला, गेवराई तालुक्यात धोंडराई, रेवकी, तलवाडा, केज तालुक्यात संपूर्ण मांजराकाठ व युसूफवडगाव, बनसारोळा, नांदूरघाट, परळी तालुक्यात नागापूर, सिरसाळा, शिरूर तालुक्यातील तिंतरवणी, ब्रम्हनाथ येळंब या महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. याच बरोबर दि.१६ ऑगस्टच्या पहाटे ही पावसाने हजेरी लावली असून इतर अनेक ठिकाणी सुद्धा पिके पाण्यात आहेत. तर काही ठिकाणी नदीचे पात्र ओलांडून पाणी शेतात शिरले आहेत. केज तालुक्यातील मांजरा नदी दुथडी भरून पाहत असून राजेगाव, दैठणा, बोरगाव, भोपला, हदगाव, डोका व लाखा या सात गावासह संपूर्ण मांजरा पट्ट्यातील गावे क्षतीग्रस्त झालेली आहेत. उभ्या पिकांचे नुकसान झाले आहेच पण जमीनीही



खरडून गेल्या आहेत. अनेक वस्त्यांमधे पाणी आले असून घरांची पडझड झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांना दिली. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी दिवसभरातील विविध कार्यक्रमांचे दौरे रद्द करत तातडीने क्षतीग्रस्त गावात जावून भेट देण्याचा निर्णय घेतला. राजेगाव येथे ते पोहचले तेव्हा पाऊस सुरूच होता. पडत्या पावसात खा.सोनवणे हे शेतातील पाण्यात उतरले. यावेळी पाण्यातील पिकांची काय अवस्था झाली आहे, हे स्वत: पाहिले. संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसण्याचेही काम खा.सोनवणे यांनी केले. पुढे, दैठणा, बोरगाव, भोपला, लाखा या गावातील नदीपात्राशेजारील शेतात जिथे पाणी शिरले आहे, अशा ठिकाणी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी धीर तर दिलाच पण तुमच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी राज्य सरकार व जिल्हा प्रशासनाला बोलत आहे. संकटाच्या काळात शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली. मदत मिळवून देण्यासाठी आपल्याला शासन स्तरावर जे जे करावे लागेल, ते आपण करू, असा शब्दही त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

# भव्य तिरंगा पदयात्रा कोळगाव येथे संपन्न



**अहिल्यानगर । गणेश गाडेकर**

मा. मंत्री श्री. बबनराव पाचपुते व आमदार विक्रम सिंह बबनराव पाचपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंगा पदयात्रा संपन्न करण्यात आली .दिनांक १४ ऑगस्ट २०२५ (गुरुवार) ८.३० वाजता कोळगाव ग्रामपंचायत कार्यालय ते सैनिक सांस्कृतिक भवन पर्यंत स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येवर देशभक्तीचा जागर करण्यासाठी आयोजित करण्यात आली या भव्य तिरंगा पदयात्रेत भाजपा पूर्व मंडल श्रीगोंदाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .तिरंगा झळकवा, देशभक्ती जागवा! असा स्लोगन देण्यात आला याचे आयोजन भाजप पूर्व मंडल श्रीगोंदा

सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले होते यावेळी माजी मंत्री बबनदादा पाचपुते, श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम सिंह बबनराव पाचपुते पूर्व मंडल अध्यक्ष डॉक्टर विक्रम भोसले कोळगाव चे लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम भैय्या लगड युवा मोर्चाचे अध्यक्ष व कोळगाव चे माजी उपसरपंच नितीन अण्णा नलगे भाजप नेते भूषणराव बडवे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा उपाध्यक्ष गणेशराव लगड युवा नेते अक्षय अनभुले ग्रामपंचायत सदस्य विलासराव शितोळे,महिंद्रा रणसिंग,जयराज लगड,चिमणराव बाराहाते, संजय जगताप, अशोक जगताप मेजर,दीपक लगड,बाळासाहेब शिरसाट,बांदल मेजर,बापू कर्डिले,आदिनाथ धस,संदीप नलगे,माऊली डुबल,कल्याण आढाव,वैजयंती ताई लगड,उषाताई कर्डिले व शाळेतील विद्यार्थी होते.

# माऊली विद्यापीठ संकुलात भारतीय स्वातंत्र्यदिना निमित्त पाचशे झाडे लावण्याच्या उपक्रमाची सुरूवात

## स्वातंत्र्यरक्षणाबरोबरच पर्यावरण संवर्धन काळाची गरज-आदित्य पाटील

**केज । प्रतिनिधी**

भारताच्या उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी स्वातंत्र्याचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाची गरज व भविष्याची मागणी असण्याचे प्रतिपादन माऊली विद्यापीठ केजचे सचिव आदित्य पाटील यांनी केले. ते ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माऊली विद्यापीठ संकुलात सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झेंडावंदन कार्यक्रमात ते अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते.

यावेळी सचिव आदित्य पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी श्रीमती तेजस्विनी अशोक पाटील, सौ. देविका आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रताप मोरे, प्राचार्य डॉ. गौतम पाटील, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरण संरक्षण व हरितक्रांतीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलत यावेळी मान्यवरांच्या हस्ते संकुल परिसरात ५०० झाडांच्या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प स्वातंत्र्य दिनी घेण्यात आला.

सरस्वती कन्या प्रशाला, रामराव पाटील मा उच्च माध्यमिक विद्यालय,आदर्श प्राथमिक विद्यालया यांसह विविध शाखेचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश माने, प्रास्ताविक श्री. नारायण चोले तर आभार प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांची यावेळी उपस्थिती होती.

# कै.खासदार वसंतराव चव्हाण यांची प्रथम जयंती बालाजी कतुरवार यांच्या निवासस्थानी साजरी

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्याचे खासदार कै. वसंतराव चव्हाण यांच्या प्रथम जयंती आज दिनांक १५ ऑगस्ट रोजी नायगांव शहरातील राममंदिर जवळील मारोती कत्तुरवार यांच्या निवासस्थानी करण्यात आली जयंतीची सुरुवात कै खासदार वसंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली यावेळी नायगांव नगरपंचायतचे नगरअध्यक्ष प्रतिनिधी संजय चव्हाण , सामाजिक कार्यकर्ते रवींद्र भालेराव, सामाजिक कार्यकर्ते श्री माणिकराव चव्हाण, युवा उद्योजक पवनकुमार गादेवार,शरद भालेराव, सामाजिक कार्यकर्ते मारोती कत्तुरवार, आदी मान्यवर



उपस्थित राहून आदरांजली वाहिली पवनकुमार गादेवार यांनी कै खासदार वसंतराव चव्हाण यांच्या जिवन चारित्र्यावर विचार व्यक्त केले व मागिल आठवणी काढत भाऊक झाले त्यांनी केलेल्या कार्याची आठवण आम्ही नायगांवकर कदापि विसरू शकत नाही अशा भावना व्यक्त केल्या, अभिवादन करण्यासाठी कृषी महाविद्यालय हास्टेलच्या विद्यार्थी तर वार्ड क्रं १३,१४,१५ येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमांचे सूत्रसंचालन नलबलवार सर तर आभार, ज्ञानेश्वर परतवाड यांनी मानले.

# शेतकऱ्यांचे केली किटकनाशकाची फवारणी मात्र किटकनाशक सोडून सोयाबीनच करपले

## कंपनी कडून शेतकऱ्यांला नुकसान भरपाई द्यावी व तात्काळ पंचनामा करावा शेतकऱ्यांची मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कळंबअंबा येथील मारोती तुकाराम ढवारे यांनी आडस येथुन पतंगे कृषी सेवा केंद्र येथून सोयाबीन फवारणीसाठी जयकिसान कंपनीचे रायपर हे किटकनाशक ची फवारणी केली असता सोयाबीन पिवळे होऊन करपले.त्यामुळे २५ एकर वरील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे तरी शेतकरी मारोती तुकाराम ढवारे यांनी सदरील सोयाबीन पिकाची तक्रार तहसील कार्यालय,तलाठी कार्यालय,कृषी कार्यालय येथे केली आहे तरी पण कोणत्याही कार्यालयाचा सरकारी कर्मचारी पाहणी



करण्यासाठी आला नाही तरी शासनाने तात्काळ अधिकारी पाठवुन पिकांचा पंचनामा करावा व जयकिसान कंपनीच्या रायपर कंपनी वर कार्यवाही करून कंपनी कडून शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.

# धनेगाव येथे कु.श्रावणी गुजर हिचा आडसकर यांच्या हस्ते सत्कार संपन्न



**केज । प्रतिनिधी**

दि.१६ आगष्ट २०२५ रोजी धनेगाव येथील मा.सरपंच श्री.सुहास गुजर यांची कन्या कु. श्रावणी सुहास गुजर ही विध्यार्थीनीची नांदेड शासकीय महाविद्यालय येथे बी.डी.एस. या शिक्षणा साठी पात्र झाल्यामुळे कु.श्रावणी हिस शाबासकीची थाप देत पुष्प देऊन अभिनंदन करताना,अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री.ऋषिकेश भैय्या आडसकर तसेच मा. सरपंच सतिष गुजर, चेअरमन विकास पाटील,कृषी बाजार

समितीचे संचालक पशुपती पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकिसन बाबा खोडसे,शिवदास थळकरी,रघुनंदन मोरे, बाळासाहेब नांदे, धनेश्वर गुजर,शंकर इंगळे,शाम खोडसे,गजानन गोरे,विशाल खोडसे,अमरदीप शिंदे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वांद्रे बँडस्टँडवर घुमला पुन्हा नौदल बँडचा सुमधुर ताल

**मुंबई । प्रतिनिधी**

वांद्रे पश्चिम येथील समुद्रकिनाऱ्यावरील ऐतिहासिक बँडस्टँडवर पुन्हा एकदा संगीताची लय दुमदुमली. ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल भारतीय नौदलाच्या बँडने सादर केलेल्या देशभक्तिपर आणि सुमधुर चालींनी परिसर भारावून गेला. हा विशेष कार्यक्रम राज्याचे सांस्कृतिक मंत्री ऍड आशिष शेलार यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता.ब्रिटिश काळात लोकप्रिय असलेली बँडस्टँडवरील वाद्यवृंदाची परंपरा स्वातंत्र्यानंतर हळूहळू थांबली होती. मात्र, या विभागाला बँड स्टँड हे नाव कायम राहिले. शेजारी असणारा ऐतिहासिक किल्ला आणि समुद्र किनारा यामुळे हा परिसर नेहमी तरुणाईने गजबजलेला असतो. स्वातंत्र्य दिनाच्या पुर्वसंध्येला नेव्हीच्या बँडने या परिसराचा नूर बदला आणि देशभक्तीने वातावरण भारुन गेले. स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनीही मोठ्या उत्साहाने हजेरी लावली.कार्यक्रमात नौदल बँडने



देशभक्तिपर गीते, संगीतातील काही निवडक धून वाजवून उपस्थितांचे मनोरंजन केले. संध्याकाळच्या गार वाऱ्यासह समुद्राच्या साक्षीने सादर झालेल्या या मैफलीने संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

# महिलेस अश्लिल संभाषण व शिवीगाळ केल्या प्रकरणी पोलिस ठाण्यात दोघानंवर गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**

याबाबत सविस्तर वृत्त असे कि केज, ता. केज, जि. बीड येथील रहिवाशी महिलेने दिनांक १२.०८.२०२५ रोजी केज पोलिस ठाण्यात तक्रार दिली असता गुन्हा क्र. ४३४/२०२५ मध्ये फिर्यादीने म्हटले आहे की दिनांक १२.०८.२०२५ रोजी सुमारे सांयकाळी ०६:१५ वाजण्याच्या सुमारास सईद शेख व सलाहोद्दिन काझी याने घटनास्थळी अश्लील व अभद्र भाषेत शिवीगाळ केली व सईद शेख याने व्हॅट्सप ग्रुपवर सुद्धा अश्लील व अभद्र भाषेत शिवीगाळ केल्याचे सांगितले, म्हणून केज पोलिस ठाण्यात फिर्यादींच्या तक्रारीवरून आरोपी सईद शेख व सलाहोद्दिन काझी यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ७९,३५२,३५१(२), ३५१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस बीट जमादार त्र्यंबक सोपने हे करीत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077